नक्षलग्रस्त भागाच्या जलद विकासासाठी विशेष कृती कार्यक्रमांतर्गत राज्य तसेच विभागीय आयुक्त स्तरावर निर्माण करण्यात आलेल्या अस्थायी पदांना मुदतवाढ देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
शासन निर्णय क्रमांक: नक्षल २४१७/प्र.क्र.१४२/का.१४१७
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: ०९ ऑक्टोबर, २०१७.

वाचा:

१) शासन निर्णय, नियोजन विभाग क्र. इपीडी-२५१०/प्र.क्र.२९४/का.१४२१,दि.२२ जुलै,२०१० व दि. १८ ऑगस्ट, २०१०.
२) शासन निर्णय,नियोजन विभागक्र.नक्षल-२४१५/प्र.क्र.५५/का.१४१७,दि. १० नोव्हेंबर, २०१५.
३) शासन निर्णय, नियोजन विभाग क्र. नक्षल २४१५/प्र.क्र. ५५/का.१४१७, दि. २८ फेब्रुवारी, २०१७.
४) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.०८/आ.पु.क., दि. ३ ऑक्टोबर, २०१७.

प्रस्तावना:

नक्षलग्रस्त भागाच्या जलद विकासासाठी विशेष कृती आराखडा तसेच पूरक आराखडयाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विभागीय आयुक्त,नागपूर यांचे स्तरावर ३ पदे (उप संचालक-१, संशोधन अधिकारी-१ व सांख्यिकी सहायक-१) व राज्यस्तरावर ३ पदे (उप सचिव-१, संशोधन अधिकारी-१ व लिपिक टंकलेखक-१) अशी एकूण ६ पदे शासन निर्णय क्र. इपीडी-२५१०/ प्र.क्र.२९४/का.१४२१, दि. २२ जुलै, २०१० व समक्रमांकाचे पूरकपत्र दि. १८ ऑगस्ट, २०१० अन्वये निर्माण करण्यात आली आहेत. संदर्भाधीन शासन निर्णय क्र. ३ अन्वये सदर अस्थायी पदांना दि. १ मार्च, २०१७ ते दि. ३० सप्टेंबर, २०१७ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आली होती. सदर पदांना दि. १ ऑक्टोबर, २०१७ ते दि. ३१ डिसेंबर, २०१७ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

नक्षलग्रस्त भागाच्या जलद विकासासाठी विशेष कृती कार्यक्रम तसेच पुरक कार्यक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी खालीलप्रमाणे नमूद विभागीय आयुक्त, नागपूर यांचेस्तरावर निर्माण करण्यात आलेल्या ३ व राज्यस्तरावर निर्माण करण्यात आलेल्या ३ अशा एकूण ६ अस्थायी पदांना दि. १ ऑक्टोबर, २०१७ ते दि. ३१ डिसेंबर, २०१७ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

राज्यस्तरावर निर्माण करण्यात आलेली पदे:

अ.क्र.	पदाचे नाव	पदसंख्या
१	उप सचिव	१
२	संशोधन अधिकारी	१
३	लिपिक टंकलेखक	१
	एकूण	**३**

विभागीय आयुक्त, नागपूर यांचे स्तरावर निर्माण करण्यात आलेली पदे:

अ.क्र.	पदाचे नाव	पदसंख्या
१	उप संचालक	१
२	संशोधन अधिकारी	१
३	सांख्यिकी सहायक	१
	एकूण	**३**

२. राज्यस्तरावर निर्माण करण्यात आलेल्या तीन पदांसाठी होणारा खर्च हा "मागणी क्रमांक ओ-७, ३४५१ सेक्रेटरीएट-आर्थिक सेवा, ०९०, सेक्रेटरीएट (०१) (०१) नियोजन विभाग,योजनेत्तर (३४५१०१८२) दत्तमत, ०१ वेतन" या लेखाशीर्षाखाली त्या त्या वित्तीय वर्षासाठी उपलब्ध असलेल्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. तसेच विभागीय आयुक्त, नागपूर यांचे स्तरावर निर्माण करण्यात आलेल्या पदांसाठी होणारा खर्च "मागणी क्रमांक ओ-७, ३४५१ सेक्रेटरीएट- आर्थिक सेवा, ०९०, सेक्रेटरीएट (०२) राज्य नियोजन यंत्रणेत वाढ करणे, (०२) (०१) विभागीय आयुक्तांचे कार्यालय, नियोजन कक्ष योजनेत्तर (३४५१ ०३४२) दत्तमत" या लेखाशीर्षाखाली त्या त्या वित्तीय वर्षासाठी उपलब्ध असलेल्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. हे आदेश वित्त विभाग, शासन निर्णय क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.०८/आ.पु.क., दि. ३ ऑक्टोबर, २०१७ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०१०१५४२१०६२१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Aher Narendra Waman

Digitally signed by Aher Narendra Waman
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Planning Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=93ab34830c74c1bdd18aba78607581bb0e2e31858d9e191999dca16966984dbb, cn=Aher Narendra Waman
Date: 2017.10.10 15:32:18 +05'30'

(नरेंद्र वा. आहेर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल कार्यालय (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई.

२. महालेखापाल कार्यालय (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर.
३. महालेखापाल कार्यालय (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
४. महालेखापाल कार्यालय (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर.
५. अधिदान व लेखा अधिकारी , मुंबई.
६. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
७. विभागीय आयुक्त,नागपूर.
८. जिल्हाधिकारी, गडचिरोली/गोंदिया/चंद्रपूर/भंडारा.
९. संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय , मुंबई
१०.उप आयुक्त (नियोजन) विभागीय आयुक्तांचे कार्यालय, नागपूर.
११.जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर.
१२.वित्त विभाग (अर्थसंकल्प-१६/ व्यय-८/अर्थोपाय), मंत्रालय, मुंबई ३२.
१३.कार्यासन अधिकारी (का. १४२१/का.१४२२/का१४२४), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१४.निवडनस्ती, कार्यासन १४१७.